माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ११५/२०२४**

**तक्रारकर्ता, ॲड. केशव राजेनिंबाळकर ,**
**रा. २/२, निवारा बिल्डिंग, सहयोगनगर, बीड**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,**
**तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अचलपुर जि.अमरावती**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी,**
**अचलपुर जि.अमरावती**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २६.१०.२०२३ | - | ०५.०२.२०२४ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २३०१/२०२३, दि. २६.१०.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

अपिलार्थी ॲड. केशव राजेनिंबाळकर यांनी आपल्या कार्यालयास दाखल केलेल्या दि. १५.०५.२०२३ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर आदेश पारीत करण्यात आलेत नाहीत. त्यामुळे अपीलार्थी यांनी आयोग कार्यालयाकडे दि. ०४.०८.२०२३ रोजी व्दितीय अपिल दाखल केले. सदर व्दितीय अपिल संदर्भात आयोगाच्या दि. २६.१०.२०२३ आदेशान्वये सदर प्रकरणी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन **स्वयंस्पष्ट** आदेश पारित करावे असे आदेशीत करण्यात आले. तथापि, अद्यापपर्यंत आपल्या कार्यालयाकडून प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारीत करण्यात आले नाहीत. त्यामुळे अपीलार्थी यांनी आयोग कार्यालयात तक्रार दाखल केली आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६, दि.१२.१२.२००७, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००**८**/**६८८**/प्र.क्र.**२१९**/०**८**/६, दि. **१०.०६**.२००८, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४ प्र.क्र.२४०/**६,** दि. १३.०२.२०१५ **नुसार** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल**ाची** सुनावणी घे**ण्याबाबत तसेच राज्य माहिती आयोगाकडून पारीत होणाऱ्या निर्णय/निर्देश इत्यादीचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशीत करण्यात आले** आहे.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्यास अपिलार्थी यांनी त्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असल्यास असे व्दितीय अपिल

सुनावणी न घेता सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेण्यात यावी. असे स्पष्ट आदेश मा. उच्च न्यायालय यांनी दिले आहेत. आयोगाकडे प्राप्त व्दितीय अपिलाचे अवलोकन केले असता, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेणे अपेक्षीत असल्याने प्रथम अपीलावर सुनावणी घेण्यासाठी दि. १९.१२.२०२३ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहे. तथापि, सदर प्रकरणी अद्यापही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी आयोजीत करुन आदेश निर्गमित केले नाहीत, ही बाब गंभीर आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाचा अवमान करणारी आहे. तरी सदर प्रकरणी त्वरीत प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात येवून योग्य ते स्वयंसष्ट आदेश पारीत करण्यात यावेत.

तसेच प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेल्या जोडपत्र-अ मध्ये अपिलार्थी अॅड.केशव राजेनिंबाळकर यांनी मागितलेली माहिती ही आपल्या अधिनस्त कार्यालयात दिव्यांग या संदर्भातील नियुक्ती झालेल्या व्यक्ती विषयी असल्यामुळे अशा संवर्गातील नियुक्ती देतांना संबंधित व्यक्तीने सादर केलेली प्रमाणपत्रे, युनिक डिसअॅबिलीटी आयडेन्टीटी कार्ड (Uniq[ue] Disability ID Card), व इतर कागदपत्रांची मागणी केली असून, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी अॅड.केशव राजेनिंबाळकर यांनी मागणी केलेली माहिती ही शासकिय सेवेमध्ये दिव्यांग संवर्गातून रुजू झालेल्या व्यक्ती संदर्भात असल्यामुळे शासनाच्या धोरणानूसार योग्य व पात्र उमेदवारांना त्या त्या संवर्गासाठी राखीव असलेल्या जागांना प्रवेश मिळाले किंवा कसे हे जाणून घेण्याचा अधिकार हा नागरिकांना आहे व त्यामुळे अपिलार्थी अॅड. केशव राजेनिंबाळकर यांनी दाखल केलेला प्रस्तुत जोडपत्र-अ मधील माहिती ही खर तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ (१) नूसार स्वयंप्रेरणेने उघड करणे अपेक्षीत असून, या बाबतीत **मा.सर्वोच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन (सिव्हील) ९९०/२०२१ किशनचंद जैन विरुध्द युनियन बँक ऑफ इंडीया यात दि.१७.०८.२०२३ रोजी** दिलेल्या आदेशात सर्व सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे अख्त्यारित असलेले (Information Held by Such Authorites) ही स्वयंप्रेरणेने उघड करुन शक्यतो स्वत:च्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा कार्यालयात नागरिकांना ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक असून, संबंधित माहिती अर्जाचा विषय हा दिव्यांग संवर्गातून शासकिय सेवेत रुजू झालेल्या उमेदवाराविषयी असल्याने त्यासंबंधीत उमेदवारांची दिव्यांग संवर्गात असल्याविषयीची कागदपत्रे ही प्रथमदर्शनी कलम ८ (१) (ञ) अन्वये खाजगीपणाच्या हक्कावर हस्तक्षेप करित असेल, असे वाटत असेल तरी ती उघड केल्याने साध्य होणारे व्यापक जनहित हे कलम ८ (२) च्या तरतुदीनूसार अधिक व्यापक असल्याने व अशी माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानिपेक्षा अधिक असेल तर, ती जन माहिती अधिकारी यांना उघड करण्याची कायद्यातील तरतूद लक्षात घेता, विषयांकीत माहिती ही शासकिय सेवा, त्यात झालेली भरती व विशिष्ट दिव्यांग संवर्गातून उमेदवारांना शासनाच्या धोरणानूसार देण्यात आलेली सूट याबाबतीतील असून अशा पदांवर नियुक्त झालेले उमेदवार हे त्या संवर्गातीलच असल्याविषयी त्यांनी केलेली कागदपत्रे ही खाजगी स्वरुपाची असू शकत नाही. त्यामुळे वरील कागदपत्रे हे संबंधित प्राधिकरणाने केवळ अपिलार्थीस देणे अपेक्षीत नसून, ती स्वत:च्या शासकीय अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देणे अपेक्षीत आहे. तसेच याबाबतीत अपिलार्थी हे स्वत:ही दिव्यांग संवर्गातील असून, मागितलेल्या माहितीत कुठलाच वैयक्तीक हेवादावा

आढळून येत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जारी करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सर्वच विभागांवर विभाग खाते तसेच शासनाच्या अख्त्यारितील विविध प्राधिकरणे यात अनेक संवर्गातून पद भरती केल्या जाते त्यातून ज्या ज्या संवर्गासाठी ज्या जागा राखीव आहे तेथे पात्र व सूयोग्य उमेदवार यांची निवड होते किंवा कसे याची पदभरती करणाऱ्या संस्थेव्यवतिरिक्त सार्वजनिक अंकेक्षण (Public Audit) होणे आवश्यक होण्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना देखील याबाबतीत संवर्ग निहाय माहिती करित असतांना व विशेषत: ज्यांना विशेष सूट दिल्या जात आहे अशा संवर्गाविषयी म्हणजेच दिव्यांग, क्रिडा व इतर तत्सम यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे इत्यादीबाबत मागील काही वर्षापासून उद्भवलेले वाद तसेच काही प्रकरणाध्ये खोटे किंवा दिशाभूल करणारे प्रमाणपत्रे सादर करण्याच्या घडलेल्या घटना लक्षात घेता, अशा संवर्गामधील व्यक्तींनी सादर केलेली प्रमाणपत्रे ही त्यांच्या नियुक्ती आदेशाबरोबरच सार्वजनिक संकेतस्थळावरच उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहे. यास्तव तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक :** २९-०३-२०२४

जावक क्रमांक २०५८ दिनांक 03 APR 2024